ISSN 2250 - 1185

# मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे इतिहास संशोधन मंडळ, मुंबई

## भारतीय इतिहास आणि संस्कृति

### त्रैमासिक



(वर्ष: ५५) एप्रिल-जून २०१८ (पुस्तक :२१७)

Scanned by CamScanner

# भारतीय इतिहास आणि संस्कृति

## अनुक्रमणिका


१. वैधता आणि निष्ठा. अठराव्या शतकातील नागपूर राज्य
-डॉ. प्रभाकर गद्रे

२. महात्मा फुले यांच्या धार्मिक सुधारणा - प्रा.रमिला गायकवाड ०१

३. महाराष्ट्राचे लोक दैवत खंडोबा : ऐतिहासिक संदर्भ
-डॉ. गोरखनाथ पांडुरंगराव फसले १७

४. शिवकालीन महाराष्ट्रातील जैन समाज- डॉ. जी. बी. शहा २३

५. शेंदुर्णी एक ऐतिहासिक परिप्रेक्षक- श्री. दिपक बाबुलाल शिरसाट २९

६. ग्रंथ परीक्षण - १. महाराष्ट्राचा कंठमणी डॉ. चिंतामणराव देशमुख ४१
परीक्षकः प्रा.रमिला गायकवाड

२. सुभेदार मल्हारराव होळकर एक राष्ट्रपुरुष ५२
परीक्षकः-डॉ. जी. बी.शहा ५४


लेखातील मतांशी इतिहास संशोधन मंडळ सहमत असेलच असे नाही.
तसेच शोधनिबंधांची जबाबदारी स्वतः लेखकावर राहील.

Scanned by CamScanner

# ५.शेंदुर्णी एक ऐतिहासिक परिप्रेक्षक

लेखक-श्री. दिपक बाबुलाल शिरसाट
भ्रमणध्वनी-९७६७३६९६३७

## प्रस्तावना

शेंदुर्णी हे गाव ता. जामनेर जि. जळगाव मध्ये येते. जळगाव जिल्ह्यात १५ तालुके आहेत. पैकी जामनेर हा महत्त्वाचा तालुका होय. जामनेर तालुक्यामध्ये १३२ गावे आहेत.[१] शेंदुर्णी हे गाव मराठवाड्याच्या सीमेवर वसलेले आहे. पाचोरा रेल्वे स्थानकापासून पाचोरा-जामनेरही छोटी रेल्वे (PJ) या गावावरून जाते. गावाच्या दक्षिणेस तीन की. मी. अंतरावर मराठवाड्याची हद्द सुरू होते. गावाचे भौगोलिक क्षेत्रफळ ४२५८ हेक्टर आहे. शेंदुर्णीचे स्थान २००३५ उत्तर ७५०३५ पूर्व अक्षांश रेखांश आहे.[२] शेंदुर्णीचा उल्लेख पंढरपूर येथील ८४ च्या शिलालेखात सेंद्रकर्णी असा आहे.[३]

## शेंदुर्णी नावाची उत्पत्ती

प्राचीन काळात प्रचंड पाण्याचा साठा शेंदुर्णी या गावास लाभलेला होता. ऐतिहासिक पुराव्यावरुन या गावाची तीन वेळा निर्मिती झालेली असावी. शेंदुर्णी या परिसरात पूर्वी हुंडासुरानंतर सिदुरासुर नावाचा राक्षस राहत होता. सिदुरासुर नावाचा पुढे अपभ्रंश होत जाऊन शेंदुर्णी हे नाव पडले असावे. प्राचीन काळी हे गाव ऋषिकेश म्हणून ओळखले जात होते. शेंदुर्णी गावाचा उल्लेख शवनतपुरे या नावाने हरिविजय ग्रंथात आलेला आहे.

शेंदुर्णी गावाची उत्पत्ती बघता काही मध्ययुगीन काळातील ऐतिहासिक संदर्भ देखील अभ्यासास मिळतात. मोगल साम्राज्याच्या काळापासून ते जहागीरीचे गाव होते. मोगल काळात शेंदुर्णी मुस्लीम जहागीरदाराची होती. दुसरा बाजीराव याने असिरगडच्या किल्ल्याजवळ सर माल्कम याच्याशी तह केला. या तहान्वये बाजीरावाने शेंदुर्णी गावाची जहागिरी हस्तगत केली. या जहागिरीत एकूण ३६ गावे होती. या ३६ गावांचा कारभार शेंदुर्णी गावातून केला जात असे. पेशव्यांनी या जहागीरीची विभागणी दोन भागात केली. पैकी एक भाग श्री. केशव जगन्नाथ दीक्षित यांना १२ गावे व दुसरा भाग सरदार गंगाधर दीक्षित यांना २४ गावे जहागिरी म्हणून दिली. तेव्हापासून शेंदुर्णीचे दोन भाग करण्यात आले.





दक्षिण भाग व उत्तर भाग जहागिरी म्हणून ओळखली जात होती. महाराष्ट्रात आज शेंदुर्णी एकमेव गाव आहे की त्यात दोन विविध कार्यकारी सोसायट्या कार्यरत आहेत. शेंदुर्णीच्या जहागिरीवर पाटणकर दीक्षित घराणे पेशव्यांकडे उपाध्ये म्हणून कार्यरत होते. त्यांना देखील जहागिरी मिळालेली होती असे सांगितले जाते.

जहागिरदार संपूर्ण गावाचा करभार पाहत होते. करवसुलीचे तीन भाग पाडले जात. पहिला भाग सरकारी खजिन्यात. दुसरा भाग गावाच्या विकासासाठी जात असे. तिसरा भाग जहागीरीसाठी खर्च केला जात होता. जहागिरदारांना न्याय देण्याचे अधिकार होते. पूर्वी न्यायालय असल्याचे सांगितलं जाते. दोन्ही जहागिरदारांना राहण्यासाठी निवासाची व्यवस्था होती. त्यांना जामखाना म्हणत. आजही तो शेंदुर्णीत आहे. त्याचा बराचसा भाग मोडकळीस आलेल्या अवस्थेत आढळतो. गढीची माती पांढरी असल्यामुळे आजही लोक घरासाठी येथील पांढरी माती खोदून नेतात. आजही ३ फुट उंचीचा नक्षीकाम केलेला दगडी दरवाजा या गढीच्या कुशीत आहे. अहिल्यादेवी होळकरांची वतनदारी शेंदुर्णी असल्याचा उल्लेख देखील सांगितला जातो.[४]

## धार्मिक व सांस्कृतिक घटक

गावपातळीवर समाजाची एक स्वतंत्र संरचना अस्तित्वात असते. काळी आणि पांढरी मिळून गावाचे शिवार वसलेले असते. या शिवारात शेतकरी व मजूर मिळून एक समाज नांदत असतो. स्थानिक ग्रामदेवतांशी या समाजाचे भावनिक नाते असते. शेंदुर्णीत काशीविश्वेश्वर देवालय आहे. याखेरीज त्रिविक्रम मंदिर, श्री. दत्त मंदिर, श्री राज राजेश्वर मंदिर, गोमुख, श्री. कृष्ण मंदिर, श्री. राम मंदिर, गढी यासारख्या धार्मिक व सांस्कृतिक घटकांचा समावेश होतो.[५]

## हेमांडपथी काशिविश्वेश्वर देवालय

हे मंदिर सोननदीच्या काठावरती शेंदुर्णी गावाच्या पश्चिमेला आहे. मंदिराचे मुख पूर्व दिशेला आहे. काशिविश्वेश्वर मंदिर प्राचीन असल्याचे सांगितले जाते. राष्ट्रकूट, यादव या घराण्यांनी त्यांचा जीर्णोध्दार केल्याचे सांगितले जाते. त्या काळापासून ते हेमाडपंथी मंदीर तयार केले. १७ व्या शतकापासून शाहूमहाराजांनी २१ मंदिरांचा जिर्णोद्धार केल्याचा उल्लेख आहे. त्या पैकी विसावे मंदिर शेंदुर्णीतील होय. यावरून मंदिराला विसदेवळी देखील

म्हटले जाते. प्राचीनकाळी या मंदिरावर अतिशय तेजस्वी व तपस्वी काशिविश्वेश्वराचे वास्तव्य होते असे सांगितले जाते. श्रीपार्वतीनंदस्वामी यांनी दोन वेळा येथे तपश्चर्या केली होती. त्यातील या मंदिराचे विसदेवळी नाव बदलून, काशिविश्वेश्वर शिवालय असे नाव दिले असल्याचे सांगितले जाते. या मंदिराच्या पश्चिमेच्या भिंतीवर सभा मंडपात जमीनीपासुन ४ फुट उंचीवर शिलालेख आहे. त्यांची रुंदी १.५ फुट उंची २.५ फुट व एकुण ओळी १६ आहेत. ४५ वर्षांपूर्वी लेख शाबुत होता. पहिली ओळ नमः शिवाय अशी आहे. काही ओळी पुसट स्वरुपाच्या आहेत. १४ व्या ओळीत तोषती सुरविर।। मुर्तीसु असा उल्लेख आहे. या शिवाय मंदिर कोणी बांधले त्याचा उल्लेख येत नाही. याला खोलेश्वर मंदिर देखील म्हटले जाते. यावरुन सिंघण यादवाचा शके ११३२-११६९ एक खोलेश्वर नावाचा पराक्रमी ब्राह्मण सेनापती होता. त्याने किंवा त्याच्या स्मरणार्थ त्याच्या पुत्राने देऊळ बांधले असावे. म्हणून खोलेश्वर हे शेंदूर्णीकर जाहागीरी म्हणून दिले असावे. त्याच्या पुत्राने -पोत्राने हे मंदिर बांधले असावे. खोलेश्वर हे नाव देखिल देशस्त ब्राह्मणात अद्याप रूढ आहे. म्हणून शेंदूर्णी हा शब्द शेंद्रकपर्णी या नावाचा अपभ्रंश असावा कन्नड तालुक्यातील नेवापुर जवळ सेंद्रे म्हणुन एक गाव आहे ते सेंद्रकाचे मूळ गाव असावे असा उल्लेख आढळतो . सेंद्रक राजवटीकडे शक ४०० पासून शक ८०० पर्यंतच्या काळात असलेले शेंदूर्णी गाव यादवाच्या किंवा राष्ट्रकुटाच्या हाती गेले व सिंघणाच्या काळात खोलेश्वराच्या ताब्यात गेले असावे असे मत राजवाडे यांनी मांडले आहे.[१]

काशिविश्वेश्वर मंदिराचे वैशिष्ट्य असे की या मंदिरावर शतरुद्र यज्ञ केल्याचे सांगितले जाते. या यज्ञामुळे या मंदिर परिसरात मार्च महिन्यात पाऊस झाला. इतरत्र मात्र पाऊस नव्हता अशी दंतकथा सांगितली जाते. दरवर्षी शिवरात्रीमध्ये मंदिरात यज्ञविधी केले जातात. या मंदिरातली शिवपिंड स्वयंभू आहे. रामदेव देवगिरीकर यांचे मुख्य प्रधान हेमाडपंत यांनी हे मंदिर बांधले, म्हणून या मंदिराला हेमाडपंथी देखील म्हटले जाते. मंदिराजवळ पूर्वेला असलेल्या सोननदीवर कुतुबुद्दिनऐबक याने दगडी बांध बांधल्याचे सांगितले जाते. त्याचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत.





## त्रिविक्रम मंदिर

संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरला मानले जाते. शेंदूर्णीलाही खानदेशातील प्रती पंढरपूर म्हणून ओळखले जाते. अशा शेंदूर्णीला संतश्रेष्ठ विठ्ठलाचा परमभक्त श्री संत कडोबा महाराज यांच्या अखंडदास्यभक्तीतून व पूर्व पुण्याईतून बहुमान मिळाला. कडोबा महाराजांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. घरात अखंड अठराविश्व दारिद्र्य नांदत होते. घराची परिस्थिती अतिशय बेताची होती. कडोबाना लहानपणी अंजिठा परिसरात जाऊन रोज सरपण मोळी आणावी लागत असे. गावात ती विकून त्यांचा चरीतार्थ चालत असे. हे काम त्यांना नित्य करावे लागत असे. अशा संसाराच्या प्रवाहात वावरताना त्यांनी विठ्ठल भक्तीची उपासना कमी पडू दिली नाही. ते वेळात वेळ काढून रुद्रेश्वर मंदिरात बसून श्री गजानन व श्री शंकर महादेव यांच्या पुढ्यात बसून अखंड नामस्मरणात तल्लीन राहत असत व त्यांची समाधी लागत असे.

## कडोबा महाराज जन्म

श्री संत कडोबा महाराजांचा जन्म १७१४ मध्ये झाला. वडील मुराडाजी आणि आई नाटूबाई हे तेली गरीब कुटुंब धावडा जि. औरंगाबाद येथे वास्तव्यास होते. त्यांच्या जन्माआधी या दाम्पत्यांना वीस अपत्ये झाली. एकही जगले नाही. या मुलाला कोणाचीही दृष्ट लागू नये म्हणून कडू नाव ठेवले. कडू अवघ्या तीन वर्षांचा असताना त्याचे वडील मृत्यु पावले. आई नाटूबाई कडूला घेवून शेंदुर्णी येथे वास्तव्य करू लागली.

## कडोबा महाराज बालपण

कडूला लहानपणापासून पंढरीच्या विठ्ठलाची ओढ होती. त्यामुळे अहोरात्र तो हरिनामाचा घोष करीत असे. रानोमाळ भटकंती करून अजिंठ्याच्या डोंगरातून सरपण मोळ्या विकून उदरनिर्वाह करीत असे. यासाठी तो भल्या पहाटे नित्याने उठून सोबत न्याहारी घेऊन एकतारा वाजवीत हरिनामाच्या घोषासह चालत असे. डोंगराच्या काळ्याभिन्न कपारीमध्ये महादेवाची पिंड व श्रीगणेशाची मूर्ती आहे. येथूनच शेंदूर्णीच्या सोननदीचा उगम होतो. उगमस्थानी स्नान करून बेलपत्री गोळा करून महादेवाची पूजा-अर्चा करीत असे. जप पूर्ण झाल्यावर जेवण-घेऊन लाकडे गोळा करीत, त्यांची मोळी बांधून सायंकाळी



Scanned by CamScanner

बाजारात विकत असे. हा त्याचा नित्याचा दिनक्रम होता.

मनात अखंड पांडुरंगाची दास्यभक्ती तेवत ठेऊन तो आपले आयुष्य उत्तम रीतीने जगत होता. पंढरीच्या पांडुरंगाची भेट घेण्याची त्याला खूप ओढ लागली होती. त्यासाठी कडोबाने सावकाराकडून पाच होन कर्ज घेतले. त्यातले तीन होन आईच्या खर्चासाठी ठेऊन सोबत दोन होन घेऊन तो पंढरीच्या वारीसाठी निघाला. सोबत अनेक वारकरी हरिनामाचा जयघोष करीत होते. प्रवासाचा पहिला मुक्काम झाला. मुक्कामाच्या पहिल्या रात्रीला कडूला विठ्ठलाने दृष्टांत दिला. कडोबा पंढरीला माझ्या भेटीसाठी येवू नकोस घरी परत जा मी शेंदूर्णीत एका उकीरड्याखाली आहे. ही ईश्वर आज्ञा मानून कडोबा महाराज वारी अर्ध्यावर सोडून घरी परत आले. गावकऱ्यांना दृष्टांत सांगितला. सर्वांनी त्यांना वेड्यात काढले. कोणीच त्यांचे ऐकत नव्हते म्हणून जहागीरदाराच्या स्वप्नात येऊन विठ्ठलाने दृष्टांत दिला. त्यामुळे कडोजीने सांगितलेला उकिरडा खोदण्यात आला. दोन दिवस सतत खोदकाम सुरू होते. तेव्हा दहाफुट लांब, सहा फुट उंच, दहाटन वजनाची भव्य वराह मूर्ती आढळली. बारा बैलजोड्यांच्या सहाय्याने वराहमूर्ती दूर केल्यानंतर एक भुयार दिसून आले. या भुयारात संत कडोजी महाराज उतरले आणि त्रिविक्रमाची सुंदर मूर्ती त्यांना दिसली. मूर्तीच्या गळ्यात ताजी टवटवीत तुळशीची माळ ताजी फुले दोन्ही बाजूला दोन समया व नंदादीप तेवत होता. हे दृश्य बघून सर्व शेंदूर्णी गाव अवाक झाले. विठ्ठलनामाच्या घोषाने सर्व शेंदूर्णी गाव दुमदुमून गेले. तेव्हापासून कडोजीला सर्व लोक संत कडोजी महाराज म्हणू लागले. शेंदूर्णी गाव खानदेशाचे प्रतीपंढरपूर म्हणून ओळखले जावू लागले.

## श्रीत्रिविक्रम शिलामुर्ती

श्री त्रिविक्रममूर्ती काळ्याभोर शालिग्राम शिलेपासून तयार केलेली आहे. ती सुमारे १७०० वर्षापूर्वीची असावी. असे पुरातत्व खात्यातील जाणकारांचे मत आहे.[*] ही मूर्ती चार फुट उंचीची असून अतिशय विलोभनीय आहे. श्रीत्रिविक्रमाच्या कपाळावर केशर कस्तुरीचा मळवट आहे. मकर कुंडले आहेत. कंबरेला पितांबर आहे. रुप सुंदर-मनोहर-निर्गुण-निराकार आहे. मूर्ती चतुर्भुज असून, हातात शंख, चक्र, गदा, व पद्म आहे. पायात पैंजण, दंडात





बाहुभूषणे आहेत. मस्तकावर शिवाकार मुकुट आहे. पायावर ध्वज, अंकुर व वज्र आहे. या मुर्तीच्या वरच्या बाजूस ब्रह्मा, विष्णु, महेश व श्रीविष्णूच्या दश अवताराच्या सुबक मुर्त्या कोरलेल्या आहेत. पायाजवळ द्वारपाल, जय-विजय विटेसारख्या आकारवर मूर्ती उभी आहे.[४]

## शेंदूर्णीतील रथोत्सव परंपरा

इ.स. १७१४ ते १८१९ या कालावधीत संत कडोजींने ही भूमी पुण्यभूमी बनवली. मराठ्यांच्या इतिहासातील हा पेशव्यांचा सुरुवातीचा काळ होता. याच कालावधीत छ. शाहूमहाराजांनी मोगलांच्या सुटकेतून मुक्त झाल्यानंतर श्रीवर्धन स्थित बाळाजी विश्वनाथ (पटवर्धन) याला पहिल्या पेशव्याची वस्त्रे दिली होती. कडोजी महाराजांनी रथयात्राउत्सव इ.स. १७१४ पासून प्रारंभ केला. हा रथ कासोद्याच्या (एरंडोल जि. जळगाव) कारागिराने बनविल्याचा उल्लेख आहे. रथोत्सव सोहळ्या प्रसंगी दिंडी समारंभात दोनदोनशे गुरांचे ताफे, नऊशे भेरी, व पाच हजार चोखा मेळा दिंडी समारंभाने गरजतांना दिसले असे सांगितले जाते. इ.स. १८१९ मध्ये कार्तिक शुद्ध पौर्णिमा शके १७४१ मध्ये महापुरुष शेंदूर्णीचा इतिहास रचून व लिहून अस्ताला गेला. आजही ही रथाची परंपरा श्री संत कडोजीचे आठवे वारस ह.भ.प. शांताराम महाराज भगत वैभवाने चालवित आहेत. या रथयात्रेला प्रचंड गर्दी असते. दरवर्षी आषाढी एकादशीला व कार्तिक शु. एकादशीला मोठी यात्रा भरते. वराह पुराणात या मंदिराबद्दल उल्लेख केलेला आहे.

## श्री दत्त मंदिर

शेंदूर्णी नगरीत प्राचीन गोपाळांचे मंदिर अतिशय पुरातन आहे. महानुभव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामींचे या मंदिरात अनेक दिवस वास्तव्य होते. या परिसरात त्यांनी आपले धार्मिक तत्वज्ञान मांडले. रुपकात्मक उपदेश भक्तांना केला. महानुभव संप्रदायातील अनेक महान विभूतींचे या मंदिरात वास्तव्य झाले आहे. तपश्चर्या करण्यासाठी अनेक तपस्वी या मंदिरात येत असत. महानुभव संप्रदायातील आचार्य कै. प. पू. श्री शेवलीकर बाबा यांचे देखील अनेक दिवस या मंदिरात वास्तव्य होते.

शेंदूर्णी गावाच्या दक्षिणेस सोयगाव तालुक्याकडे जाताना उंच, टेकडी,

दाट झाडी, शांत रमणीय प्रसन्न वातावरणात श्री दत्त मंदिर आहे. येथेच श्री चक्रधर स्वामींचे आगमन झाले होते. या गावात सोन नदीच्या काठी गवळी लोक राहतात. त्या परिसरात हे भग्नावस्थेत मंदिर होते. गावाबाहेरील मंदिर व गावातील मंदिर त्यांची महास्थाने म्हणून गणली जातात.

याच मंदिरात प्रवेश करतांना डाव्या बाजूला जेथे स्वामींच्या लिलांचा बोर्ड लावलेला आहे ते श्री चक्रधर स्वामींचे निद्रेचे स्थान होते. त्याच शेजारी मादन आणि मर्दनाचे स्नान म्हणजेच अंग घासण्याचे व आंघोळ करून अंग स्वच्छ पुसण्याचे स्थान होते. मंदिराच्या पाठीमागे स्वामींचे लघूपरिसराचे स्थान होते. या ठिकाणी स्वामींनी विविध लीला केल्या त्यांचा उल्लेख लिळाचरित्रात पाहायला मिळतो. स्थानिक पोथ्यात मंदिराचे वर्णन पाहायला मिळते.[९] पूर्वी प्राचीन मंदिर हेमाडपंथी बांधकाम दगडावर रचून केलेले होते. अलीकडे या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. दि. १७-९-१९९३ या दिवशी महानुभाव साहित्य महामंडळ व जळगाव जिल्हा साहित्य परिषद यांचे संयुक्त विद्यमाने दुसरे अखिल भारतीय महानुभाव साहित्य सम्मेलन शेंदूर्णी नगरीत भविण्यात आले होते. त्यानंतर २०१३ साली देखील शेंदूर्णी नगरीत महानुभाव संप्रदायाचे सम्मेलन सोयगाव रस्त्यावर मंदिरापासून ७०० मीटर अंतरावर भरविण्यात आले होते. दि. ९ नोव्हेंबर २०१७ पासून दृष्टांत स्थळ सोहळा अखिल भारतीय महानुभावसंप्रदायांचे ४५ दिवस संमेलन भरले होते.[१०]

## श्रीराज राजेश्वर मंदिर गोमुख

शेंदूर्णी येथील सोन नदीच्या डाव्या काठावर सुनील सुधाकर साने यांच्या मालकीच्या शेतात गोमुख आहे. आज ते बंद अवस्थेत आहे. नदीच्या काठावर १५-१८ फूट उंच घाटवजा बांधकाम आहे. तेथे नदीच्या पात्र पातळीस समांतर कुंड आहे. या गोमुख कुंडाच्या बाजूस घुमट वजा शिवमंदिर आहे. (२०×२०) चौथऱ्यावर आधारित बांधकाम आहे. मंदिराच्या समोर नंदी मंडप आहे. मंदिराचे बांधकाम पूर्णतः दगडात आहे. बांधकाम श्रेणी उत्तर पेशवाई काळातील आहे. नंदी मंडपाच्या वरच्या बाजूस घुमटाच्या आतून शिलालेख दर्शविला आहे. या शिलालेखाचे वाचन इतिहास संशोधक डॉ. प्रशांत देशमूख यांनी २०१४ मध्ये केले. त्याचे वर्ष शके १८८५ सु(स्व) भानु नाम संवत्सरे असा





उल्लेख असून शिलालेखात १६८५-१९३४-२४९ वर्ष असा उल्लेख आहे.[११]

## श्री राम मंदिर

खानदेशातील विख्यात संतकवी, लेखक, प्रवचनकार, संतचरित्रकार भिमरावमामा परळकर यांनी ८५ वर्षापासून श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याला मूर्त स्वरुप दिले. हा श्रीराम जन्मोत्सव या घराण्याने सुमारे ३०० वर्षापासून सुरु केलेला आहे. त्यांनी रामदासकथा सारामृत, नामदेव महाराज, गंगागिरी महाराज, खुशाल महाराज, संत कडोजी यांचे चरित्र लिहिले आहे. या शिवाय छ. शिवाजी महाराज यांचे चरित्र लिहिलेले आहे. मंदिरात श्रीराम, सीता, लक्ष्मण यांच्या पांढऱ्या संगमरवराच्या रेखीव आकर्षक मूर्ती असून, समोर हनुमानाची विलोभनीय मूर्ती आहे.

## गढी

पेशव्यांनी नेमलेले जहागीरदार दीक्षित हे शेंदुर्णीत कारभार पाहत होते. त्यांनी उंच व सुबक गढी गावाच्या मध्यभागी बांधलेली आहे. हा एक प्राचीन अवशेष होय. गावाची वसुली गोळा केली जाई त्यासाठी गढीत एक स्वतंत्र कचेरी होती. मंदिर होते परंतु आज ते जीर्ण अवस्थेत आहे. गढीवर जहागीरदाराचे निवासस्थानाचे अवशेष आजही आहेत.[१२]

## स्वातंत्र्य संग्रामात शेंदुर्णीचे योगदान

इ.स. १८०२ मध्ये ब्रिटिशांच्या विरोधात कलकत्ता येथे झालेल्या पहिल्या बॉम्बस्फोटात शेंदुर्णीचे आंदोलक होते. स्वातंत्र्य संग्रामात कै. नारायण गवळी, कै वामन कहारु पाटील, कै. लक्ष्मण कासार इत्यादींनी आंदोलन केल्याने जेलमध्ये होते. इ.स. १९३९-१९४२ च्या चले जाव चळवळीत कै. आप्पासाहेब भाउराव गरुड धुळ्याच्या कारागृहात होते. सुकलाल गुजर व मिश्रीलाल झवर यांनी शेंदुर्णी पोस्टाजवळ झालेल्या गोळीबारात अमरत्व पत्करले व शहिद झाले. दोघांचे स्मारक शेंदुर्णी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शहिद जवान नावाने स्तंभ उभारलेला आहे.[१३] हैद्राबाद मुक्तीआंदोलनात शेंदुर्णी गाव अग्रेसर होते. या संग्रामात होनसिंग हजारी, दत्तात्रय गुजर, दिगंबर सोनार, गजाननराव गरुड असे



Scanned by CamScanner

अनेक लोक सामिल होते." दिव दमण व गोवा पोर्तुगिजाच्या दास्यातुन मुक्त होण्यासाठी फोंडा येथील सत्याग्रहाचे नेतृत्व आचार्य गजाननराव गरुड यांनी केले. गोळ्यांच्या वर्षावात जमिनीवर झोपल्यामुळे ते वाचले. आजही शेंदुर्णी येथील कार्यकर्त्यांनी केलेली कामगिरी इतिहासात भर घालते.

## निष्कर्ष

शेंदुर्णी गावाचा उल्लेख पंढरपुर येथील ८४ च्या शिलालेखात येतो. मुगल कालखंडात शेंदुर्णीवर मुस्लिम जहागिरदारी होती व ते जहागिरीचे गाव होते. दुसऱ्या बाजीरावाची शेंदुर्णी वर जहागिरदारी होती व त्यात ३६ गावे होती. त्यांचा कारभार शेंदुर्णी गावातून केला जात असे. त्यानुसार आजही शेंदुर्णी दक्षिण व उत्तर असे विभाग आहेत. शेंदुर्णीला प्रतिपंढरपुर असे म्हटले जाते. १९४२ च्या चलेजाव चळवळीचा पडसाद शेंदुर्णी गावात झाला. त्यामुळे अनेक स्थानिक कार्यकर्त्यांनी १९४२ च्या चळवळीत बलिदान दिले याची साक्ष आजही शेंदुर्णीत पहायला मिळते. तसेच शेंदुर्णीच्या स्थानिक इतिहास लेखनास वाव आहे.

## संदर्भ व टिपा:


१. जामनेर तालुका ग्रामनाम सूची

२. चौधरी कि.का. (संपा):- जळगाव जिल्हा गॅझेटियर दर्शनिका विभाग, मुंबई प्र आ. (मराठी) १९९४ पृ.८१३

३ पाठक अ.श., स्थानपोथी: एक पुरातत्वीय अभ्यास म.रा. सा. सं. मंडळ, मुंबई प्र. आ. २०१३ पृ. ४२

४. विसपुते एस. एम. (संपा), खानदेश इतिहास परिषद, अधिवेशन १२ वे गरुड महाविद्यालय शेंदुर्णी, फेब्रु. २००६ पृ. क्र. उल्लेख नाही.

५. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि. १५ ऑक्टोबर २०१७

६. राजवाडे वि. का., त्रैमासिक भा. इ.स. मंडळ पुणे, १९११ पृ.क्र. २७

७. पि. जी. सोनवणे, मुलाखत दि. १५ नोव्हेंबर २०१७

८. प्रत्यक्ष मंदिर भेट, दि.२० नोव्हेंबर २०१७

९. पूर्वोक्त पाठक अ.श., पृ. ४२

१०. दै. सकाळ, दि.२२ नोव्हेंबर २०१७

११. देशमुख प्रशांत, शेंदुर्णी येथील गोमुख जिर्णोद्धार प्रकाशित संशोधन पेपर अ.भ.इ.







परिषद २२ वे अधिवेशन नांदेड २०१३ पृ. १६८

१२. गावीचे सर्वेक्षण, दि.२५ नोव्हेंबर २०१७

१३. प्रत्यक्ष सर्वेक्षण, दि.२१ नोव्हेंबर २०१७




Scanned by CamScanner